# International Women's day

Date: 8 March, 2022

Venue: Recreation Hall- Shivaji Mahavidyalaya Gadchiroli

Organizer: IQAC and Cultural Department

## Objectives of the Event:

01. To diminish the gender inequality.
02. To promote and appreciate the works of women.
03. To respect the girl students.

## Brief Report:

The United Nation's theme for this year's International Women's Day is *'Gender equality today for a sustainable tomorrow'*, recognizing the contribution of women and girls around the world, who are leading the charge on climate change adaptation, mitigation, and response, to build a more sustainable future for all. To promote and appreciate the work of women, every year the Cultural Department organized International Women's Day on 8th March 2022. The ladies teachers of the college were invited for the program. Mrs. K. B. Tajane was presided over the program. Smt. Surekha Chaudhar, Smt. Pragati Meshram, and Smt. Vanita Madiwar were present in the program. Cultural Dept. and his team organized the program under the guidance of principal. Students, all the faculty members, and non-teaching staff were present for the function.

## Outcomes:

It helped the students to understand the role of women in human life.

They knew the work of selected renowned women around the world.

# शिवाजी महाविद्यालयात महिलादिन साजरा

**गडचिरोली, ता. ९ :** स्थानिक शिवाजी महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मंगळवार (ता.८) ला "शाश्वत उद्यासाठी आज लैंगिक समानता'' या विषयावर प्राचार्य डॉ. एम. जे. मेश्राम यांच्या अध्यक्षतेत जागतिक महिलादिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सविता माधमवार, प्रा. चौधरी, मुधोळकर, शेंडे, प्रा. मडावार उपस्थित होत्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. जे. मेश्राम म्हणाले की, समाजात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून चालणारी स्त्री अजूनही समाजात



**गडचिरोली : कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. मेश्राम व इतर.**

काही ठिकाणी केवळ लिंग भेद करून समानसंधीपासून दूर ठेवली जाते. त्यामुळे पूर्वग्रह खंडित करा म्हणत हाच लिंगभेद मोडण्यासाठी महिलादिन साजरा करण्यात येत आहे, असे यावेळी म्हणाले.

तसेच प्रा. मुधोळकर मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, समाजात वावरताना एक स्त्री ने स्वत: स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. डॉ. माधनवार म्हणाल्या की, महिलांना त्यांच्या एक्काची जाणीव व्हावी व त्यांचे जीवन सुधारावे या हेतूने महिलादिन साजरा करण्यात यावा, तसेच महिलांनी चौकटी बाहेर पडून विविध क्षेत्रात झेप घ्यायला पाहिजे, असे म्हणाल्या. यावेळी महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शनापर कार्यक्रम वक्तृत्व शैलीचा विकास, महिला सुरक्षा अभियान, वृक्ष संवर्धन निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एस. ढोमणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे. उईके, प्रा. डॉ. विलास खुणे, प्रा. आर. कोल्हे, प्रा. शेंडे, तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.